


महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड ४, अंक २ एप्रिल २०२३ (क्र.१३)


## अनुक्रमणिका


**संपादकीय** ३

वार्तांकनातील वैविध्य आणि वास्तव

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्प ४

उमरेड कऱ्हांडला अभयारण्यातून जाणारा रेल्वेमार्ग उड्डाणपुलावर बांधण्याचा रेल्वेचा निर्णय

कर्नाळा पक्षी अभयारण्य ४

कर्नाळ्यातील पाणीसाठे फेब्रुवारीपासूनच कोरडे; कृत्रिम पाणवठ्यांमधून पाणीपुरवठा सुरू

कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य ४

कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात पक्षी सर्वेक्षणात १३० प्रजातींची नोंद

ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य ५

फ्लेमिंगो अभयारण्य व्यवस्थापन आराखड्यातील पाणथळींवर गोल्फ कोर्सच्या परवानगीची चौकशी

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ६

ताडोबा अंधारी प्रकल्पात ८७ वाघ व १२८ बिबटे

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात एका वर्षात १४ वाघ व सात बिबट्यांचा मृत्यू

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात प्रायोगिक तत्त्वावर ‘अलर्ट सिस्टिम कॅमेरा’

तुंगारेश्वर अभयारण्य ७

तुंगारेश्वर मंदिराच्या मार्गावर दोन पुलांच्या बांधकामासाठी आराखडा तयार

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प ८

नागझिऱ्यातून जाणाऱ्या महामार्गावरील वन्य प्राण्यांसाठीच्या भुयारी मार्गाचे काम संथ गतीने

कोका अभयारण्यातील टी-१३ वाघाचा मृत्यू विषबाधेमुळे; तिघांना अटक

नवेगाव नागझिऱ्याजवळ तस्करांना अटक; प्राण्यांच्या अवशेषांसह जिवंत मोर जप्त

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प / पेंच व्याघ्र प्रकल्प ९

खाणीमुळे धोक्यात येणार पेंच आणि नवेगाव नागझिऱ्याला जोडणारा भ्रमणमार्ग

पेंच व्याघ्र प्रकल्प ९

पेंचमध्ये नागरिकांच्या सहभागाने फुलपाखरू सर्वेक्षण

माथेरान पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र १०

वणवा प्रतिबंधक तंत्रासाठी ‘सगुणा रूरल फाऊंडेशन’ला वनश्री पुरस्कार; माथेरानात यशस्वी चाचणी

मेळघाट व्याघ्र प्रकल्प १०

मेळघाटात दोन शेतकरी महिलांवर अस्वलांचा हल्ला

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात प्रकल्पग्रस्तांसाठी आंदोलनाचा आमदाराचा इशारा

यावल अभयारण्य ११

यावल अभयारण्यात वनस्पतींच्या तीन नव्या प्रजाती

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प ११

“लांबलेले पुनर्वसन स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात तरी करा,” सह्याद्री व्याघ्र प्रकल्पग्रस्तांची मागणी

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान १२

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात रस्टी स्पॉटेड कॅटसाठी संवर्धन केंद्र तयार

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून बोगद्यासाठी पर्यावरणीय मंजुरी अनावश्यक – केंद्र सरकार

येऊरमध्ये मातीवाहू गाड्यांना प्रवेश देण्यासाठी वनाधिकाऱ्यानेच मागितली लाच

रात्रीचे बेकायदा समारंभ, क्रीडा स्पर्धांमुळे येऊरमध्ये ध्वनी आणि प्रखर प्रकाश प्रदूषण
आरेतील १७७ झाडे तोडण्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मुंबई मेट्रोला दंड ठोठावला

**प्रादेशिक बातम्या** १४
चार वर्षांत पँगोलीनच्या सर्वाधिक तस्करीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर
कल्याण अहमदनगर महामार्गावर वन्य प्राण्यांच्या अपघातांच्या संभाव्य जागा ओळखण्याची मोहीम
कोकण १५
गुहागरच्या किनाऱ्यावर दोन समुद्री कासवांना अंकन
डहाणूच्या किनाऱ्यावर येणाऱ्या कासवांच्या संख्येत घट झाल्याचा अंदाज
उत्तर महाराष्ट्र १६
नाशिक जिल्ह्यातील गिधाडांना उपग्रहाधारित अंकन
माणूस व बिबट्या सहजीवनासाठी नाशिक जिल्ह्यात ‘जाणता वाघोबा’ उपक्रम
माणूस-वाघ संक्षिप्त वृत्त १७
विदर्भ १८
चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांचे स्थलांतर करणार – वन मंत्री
माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त १९

**आशियाई पाणपक्षी गणना २०२३** २०
पालघर जिल्ह्यातील माकुणसार गावात पक्ष्यांच्या ९१ प्रजातींची नोंद
जळगाव जिल्ह्यातील हतनूर जलाशयावर पक्ष्यांच्या १४९ प्रजातींची नोंद
जायकवाडीत ८६ प्रजातींच्या २५,००० पक्ष्यांची नोंद

**राष्ट्रीय बातम्या** २१
देशात यंदा पहिल्या दोन महिन्यांत ३४ वाघांचा मृत्यू; सर्वोच्च न्यायालयाने केंद्राकडे मागितले स्पष्टीकरण
वणव्याच्या व्याप्तीचा अंदाज आगाऊ वर्तवणारी प्रणाली

**आंतरराष्ट्रीय बातम्या** २२
जंगलतोडीच्या जागतिक क्रमवारीत भारत दुसऱ्या क्रमांकावर; भारतातील जंगलतोड सर्वात वेगवान

**थोडक्यात पण महत्त्वाचे...** २४
लोकजीवन आणि पशुपक्ष्यांमधील जिव्हाळ्याच्या अनुबंधाची प्रचिती देणारा पावश्या

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**
**खंड ४, अंक २, एप्रिल २०२३ (क्र. १३)**
संपादकः रेश्मा जठार
साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया
साहाय्यकः राधिका अघोर
शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio
प्रकाशकः कल्पवृक्ष
**संपादकीय पत्ता**:C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.
**दूरभाष/फॅक्स**: ०२० २५६५४२३९ **ई मेल**:marathipaupdate@gmail.com
**संकेतस्थळ**:https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/
***
टीपः ‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.
***
‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य
**Duleep Matthai Nature Conservation Trust**
C/o **Foundation for Ecological Security** http://fes.org.in/
**Paul Hamlyn Foundation**
आणि
**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

## संपादकीय

### वार्तांकनातील वैविध्य आणि वास्तव

महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्राच्या कामानिमित्त होणाऱ्या विचारांचे विविध टप्पे आहेत. वर्ष २०२० च्या एप्रिल महिन्यापासून सुरू झालेले या वार्तापत्राचे आता चौथे वर्ष आहे. गेल्या तीन वर्षांत वार्तापत्राचे काम करता करता त्याच्याशी संबंधित विचारांचा साचा आहे व तो आता परिचयाचा होऊ झाला आहे. प्रत्येक अंकासाठी मजकूर शोधायला सुरुवात करताना पहिला विचार येतो तो या खेपेला संरक्षित क्षेत्राविषयी पुरेसा मजकूर मिळेल ना, मजकूर मिळाला की वाटू लागते, वृत्तांकन ठराविक प्रजातीविषयी किंवा ठराविक संरक्षित क्षेत्रातील किंवा प्रदेशातील किंवा एखाद्याच वृत्तपत्रातील असे तर दिसत नाही ना... म्हणजे मजकूर शोधताना ठराविक कल, पूर्वग्रह किंवा व्यक्तिसापेक्षता तर आड येत नाही ना... पुरेसा मजकूर मिळाल्यानंतर हायसे वाटते पण त्याचबरोबर एक बाब निश्चितपणे जाणवते; ती ही की माणूस आणि वन्यजीवांविषयी बऱ्यापैकी वृत्तांकन होताना दिसते आहे. सारा मजकूर एकत्र मांडल्यावर मग त्यातील सारखेपणा किंवा वेगळेपणा असे जे काही असेल ते लक्षात येते. या खेपेला वृत्तांकनातील वैविध्याने, त्यातील बऱ्याचशा परस्पराविरोधाने आणि काही आशादायी घडामोडींनी लक्ष वेधून घेतले आहे.

प्रस्तुत वार्तापत्राचे नियमित वाचक आणि राज्यातील संरक्षित क्षेत्रे माहिती असलेल्यांना एव्हाना जाणवले असेल की ठराविक संरक्षित क्षेत्रांमधील - जसे की विदर्भातील एखाद-दोन व्याघ्र प्रकल्प, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आदी, वृत्तांकन नेमाने वार्तापत्रात येत असते. याउलट काही संरक्षित क्षेत्रांमधील वृत्तांकन होताना दिसत नाही; तर काही संरक्षित क्षेत्रांमधील घडामोडींविषयी अपवादानेच वाचायला मिळते. अशा काही संरक्षित क्षेत्रांचा – यावल, तुंगारेश्वर, कळसूबाई - या अंकात समावेश आहे. तीच बाब प्रजातींच्या विविधतेबाबत. वाघ, बिबट्या हे मोठे प्राणी वार्तापत्राच्या प्रत्येक अंकात हजेरी लावतात. मात्र, या अंकात रस्टी स्पॉटेड कॅटसह अन्य काही प्राणी व वनस्पती प्रजातींनी उल्लेखापुरती का होईना हजेरी लावली आहे.

सिटीझन सायन्स अर्थात लोकसहभागातून वैज्ञानिक विदा गोळा करण्याचे उपक्रम राबवण्याचे महत्त्व लक्षात आल्यामुळे गेल्या काही वर्षांपासून अशा उपक्रमांमध्ये वाढ होताना दिसते आहे. त्याचे प्रतिबिंब वन्यजीव संरक्षणाच्या क्षेत्रात व पर्यायाने या वार्तापत्रात दिसून आले आहे. किमान दोन तरी बातम्या अशा प्रकारच्या उपक्रमांविषयी आहेत.

माणूस आणि बिबट्या यांच्यातील संघर्षाचे वृत्त हा या वार्तापत्राचा अविभाज्य भाग बनला आहे. ही दुर्दैवी बाब आहे. या खेपेला मात्र यामध्ये विशेष दखलपात्र बदल आढळून आला आहे. नाशिक जिल्ह्यातील संघर्षमय परिस्थितीवर लोकसहभागातून उपाययोजना करण्यासाठी 'जाणता वाघोबा' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. हा उपक्रम संरक्षित क्षेत्रापुरता मर्यादित नसून त्याबाहेरील क्षेत्रातही याची व्याप्ती आहे. असे असणे ही काळाची गरजही बनली आहे.


प्रकल्पग्रस्त हे केवळ तंत्रज्ञान, विकास प्रकल्पांचेच असतात असे नव्हे तर; आपल्या देशात एक वर्ग वन्यजीव संरक्षणासाठी निर्माण केलेल्या संरक्षित क्षेत्र प्रकल्पग्रस्तांचाही आहे. या वास्तवाची बोचरी जाणीव करून देणाऱ्या बातम्याही या अंकात आल्या आहेत. देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना, जागतिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर असताना या लहानशा पण देशाचा अविभाज्य घटक असलेल्या वर्गासमोर असलेल्या समस्यांचे भिजत घोंगडे कायम आहे. ते तसेच राहणार असेल आणि वन्यजीव संरक्षण फक्त आकडेवारी, आलेखांमध्ये आणि कागदोपत्रीच टापटीप दिसणार असेल तर महासत्ता वगैरे नुसत्या वल्गनाच ठरतील!

***

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्प

**उमरेड कऱ्हांडला अभयारण्यातून जाणारा रेल्वेमार्ग उड्डाणपुलावर बांधण्याचा रेल्वेचा निर्णय**



उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यातून जाणाऱ्या इतवारी ते नागभीड रेल्वेमार्गाला वन विभागाने आक्षेप घेतला आहे. त्यावर उपाय म्हणून रेल्वेने जंगलातील १६ किमी अंतराचा मार्ग उड्डाणपुलावर करण्याचा निर्णय घेतला आहे.

इतवारी ते नागभीड या ११० किलोमीटर रेल्वेमार्गाचे काम सुरू झाले आहे. महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. (महारेल) हे काम करत असून कंपनीचा सुधारित आराखडा तयार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या वडसा ते गडचिरोली दरम्यानच्या नवीन रेल्वे मार्गावर अशाच प्रकारे पुलावरून जाणारा मार्ग उभारण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे. वडसा-गडचिरोली या ४९.५ किमी रेल्वेमार्गासाठी खासगी आणि वन खात्याची जमीन आवश्यक आहे. गडचिरोली उपविभागातील आठ गावांमधील ४५.७६ हेक्टर खासगी जमिनीच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. या रेल्वेमार्गाचा वन्य प्राण्यांसाठी १८ ते २० किलोमीटरचा मार्ग पुलावरून जाणारा करण्यात येणार आहे, अशी माहिती दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकांनी दिली.

वडसा ते गडचिरोली आणि इतवारी ते नागभीड या दोन्ही रेल्वेमार्गांचा खर्च राज्य सरकार आणि केंद्र सरकार प्रत्येकी ५०% उचलणार आहेत. इतवारी ते नागभीड रेल्वेमार्गाचे काम डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे तर; वडसा-गडिचरोली मार्गाचे काम अद्याप सुरू व्हायचे आहे. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ४ अंक १*)

**स्रोत** - राजेश्वर ठाकरे. 'मेट्रोप्रमाणे रेल्वेही उन्नत मार्गाचा पर्याय शोधतेय! इतवारी-नागभीड, वडसा-गडचिरोली उन्नत रेल्वेमार्ग', *www.loksatta.com*, ०३.०३.२०२३.

### कर्नाळा पक्षी अभयारण्य

**कर्नाळ्यातील पाणीसाठे फेब्रुवारीपासूनच कोरडे; कृत्रिम पाणवठ्यांमधून पाणीपुरवठा सुरू**

रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्यातील पाणीसाठे यंदा फेब्रुवारी महिन्यातच आटू लागल्यामुळे वन विभागाने कृत्रिम पाणवठ्यांमधून पाणीपुरवठा सुरू केला आहे.

कर्नाळा अभयारण्यात दोन नैसर्गिक पाणवठे आहेत. उन्हाळ्यात हे पाणवठे कोरडे पडतात. त्यामुळे दरवर्षी उन्हाळ्यात वन विभाग कृत्रिम पाणवठे तयार करतो. एरवी फेब्रुवारी-मार्च महिन्यांपर्यंत अभयारण्यातील पाणवठ्यांवर मुबलक पाणी असते. मात्र, यंदा फेब्रवारी महिन्यातच पाणीसाठे आटू लागल्यामुळे वन विभागाने अभयारण्यात फेब्रुवारी अखेरपर्यंत २७ कृत्रिम पाणवठे तयार केले. वन विभागाने नेमलेले कर्मचारी या पाणवठ्यांपर्यंत पाणी पोचवण्याचे काम करत आहेत, अशी माहिती वनाधिकाऱ्यांनी दिली.

**स्रोत** – 'कर्नाळा पक्षी अभयारण्याला उन्हाच्या झळा', *www.esakal.com*, २७.०२.२०२३.

### कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य


**कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात पक्षी सर्वेक्षणात १३० प्रजातींची नोंद**

भंडारदरा वन्यजीव विभागाच्या ३७ व्या वर्धापनदिनानिमित्त वन्यजीव विभागाने 'आऊल कॉन्झर्वेशन फाऊण्डेशन'च्या सहकार्याने कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात पक्षी

सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात पक्ष्यांच्या १३० प्रजाती दिसून आल्या.

भंडारदरा धरणाच्या पाणथळ भागातही पक्ष्यांचा वावर वाढलेला दिसून आला. इथे ब्राह्मणी बदक किंवा चक्रवाक म्हणजेच रड्डी शेलडक हा स्थलांतरित पक्षी दिसून आला. धरणाच्या जलाशयातील चिलापी माशांचे प्रमाण कमी होऊन इतर माशांचे प्रमाण वाढले तर, पाणथळीत वावरणाऱ्या पक्ष्यांच्या इतरही प्रजाती या भागात येतील, असे मत एका पक्षीतज्ञाने व्यक्त केले आहे.

सर्वेक्षणात १८ पक्षीनिरीक्षक सहभागी झाले होते. असे सर्वेक्षण तिन्ही ऋतूंमध्ये करण्याचा निर्णय वन्यजीव विभागाने घेतला आहे.



**स्रोत** - 'अभयारण्यात आढळले विविध १३० पक्षी', *www.esakal.com*, ०१.०३.२०२३.

## ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य

### फ्लेमिंगो अभयारण्य व्यवस्थापन आराखड्यातील पाणथळींवर गोल्फ कोर्सच्या परवानगीची चौकशी

नवी मुंबईतील नेरुळ इथल्या एनआरआय आणि टीएस चाणक्य परिसरातील पाणथळ भागात गोल्फ कोर्स प्रकल्पासाठी महाराष्ट्र किनारपट्टी प्रभाग व्यवस्थापन प्राधिकरणा- (MCZMA)ने किनारपट्टी नियमन क्षेत्रा- (CRZ) बाबत दिलेल्या परवानगी संदर्भात चौकशीचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरविकास व पर्यावरण विभागाच्या प्रमुख सचिवांना दिले आहेत.

वन विभाग आणि कांदळवन कक्ष ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य व्यवस्थापन आराखड्याचा एक भाग म्हणून सहा पाणथळ क्षेत्रांचे जतन करण्याचे नियोजन करत असताना, MCZMA ने पाणथळ क्षेत्रांवर गोल्फ कोर्ससाठी CRZ परवानगीची मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला. याबाबत सर्वोच्च न्यायालयात प्रकरण अनिर्णित आहे. तरीही MCZMA ने ७ डिसेंबर रोजी बैठकीत हा निर्णय घेतला.

मुंबई उच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०१८ मध्ये एनआरआय आणि टीएस चाणक्य परिसरातील ३२ हेक्टरवर पसरलेल्या पाणथळ जमिनींवरील प्रस्तावित गोल्फ कोर्स प्रकल्प रद्द करण्याचा निकाल दिला होता. त्या निकालाविरोधात 'सिडको'ने सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेतली. तिथे सुनावणी अद्याप व्हायची आहे. तसेच, पाणथळ क्षेत्रांच्या मर्यादेच्या उल्लंघनांबाबत पर्यावरणवाद्यांनी केलेल्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी राज्य पर्यावरण विभागाने 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' (BNHS) चे माजी संचालक डॉ. दीपक आपटे यांच्या अध्यक्षपदाखाली नियुक्त केलेल्या विशेष समितीचा अहवालही प्रलंबित आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पर्यावरणीय प्रभाव विषयक अहवालात एनआरआय व टीएस चाणक्य या पाणथळ क्षेत्रांना स्थलांतरित पक्ष्यांचा अधिवास म्हणून जतन करण्याची शिफारस BNHS ने केली होती.

ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन MCZMAच्या निर्णयाविरोधात 'नॅटकनेक्ट' या संस्थेने केंद्र आणि मुख्यमंत्र्यांकडे ईमेलद्वारे तक्रार केली. त्याला प्रतिसाद देत मुख्यमंत्र्यांनी नगरविकास आणि पर्यावरण विभागांना या प्रकरणात चौकशी करण्यास सांगितले आहे.

**स्रोत** – 'पाणथळ क्षेत्रावर गोल्फ कोर्स! मुख्यमंत्र्यांचा हस्तक्षेप', *www.loksatta.com*, ०२.०२.२०२३.
'गोल्फ कोर्सचा मार्ग मोकळा; पाणथळ स्थळांवर भराव घालण्यास हिरवा कंदील', *maharashtratimes.com*, ०२.०२.२०२३.

<u>ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प</u>

## ताडोबा अंधारी प्रकल्पात ८७ वाघ व १२८ बिबटे



ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात ८७ वाघ आणि १२८ बिबटे आहेत. काळ्या बिबट्याची नोंदही या प्रकल्पात झाली आहे. 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' या संस्थेने केलेल्या अभ्यासात ही आकडेवारी समोर आली आहे. तसेच, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरातील गावांच्या पुनर्वसनानंतर मोकळ्या झालेल्या जमिनींवर नवीन गवताळ प्रदेशांची वैज्ञानिक पद्धतीने निर्मिती व व्यवस्थापन करण्यात आले आहे.

१९७२ च्या सुमारास खातोडा, पांढरपौनी, २००६ च्या सुमारास बोटेझरी, अर्धे कोळसा आणि त्यानंतर मागील काही वर्षात जामनी, पळसगाव, रामदेवी नवेगाव, रानतळोधी इत्यादी गावांचे गाभा क्षेत्राबाहेर पुनर्वसन करण्यात आले.

नवेगाव, जामनी, पांढरपौनी आणि पळसगाव परिसरातील गावांच्या जमिनीवर गवताच्या विविध प्रजातींची वाढ करण्यात आली आहे. एकट्या नवेगाव रामदेगी इथे २३० हेक्टर जमिनीवर गवताच्या २४ विविध प्रजाती वाढवण्यात आल्या आहेत. त्यांची मराठी नावे मोथा मारवेल गवत, लहान मारवेल गवत, रवी गवत, शिक्का गवत, मोशन गवत, कुसल गवत, घोन्याल गवत, वतन गवत, पडायळ गवत, सुरवेल गवत, रान बाजरी गवत, दतड गवत, देवधन गवत, रानतुर गवत, रानमूग गवत, हेटी गवत, डूब गवत, रान बरबती, गोंडली गवत, जंगली नाचणी, कावळा फळ, बेर गवत, दुर्वा गवत अशी आहेत. तसेच निरुपयोगी गवत काढण्यासाठी, ते वेळेवर ओळखून फळ लागण्यापूर्वी ते वर्षातून दोन ते तीन वेळा उपटले जाते. त्यामध्ये भुतगंजा, तरोटा, चिकना, लेंडुळी, चिपडी, आघाडा, पांढरा चिकवा, फेत्रा गवत, कोंबडा गवत, दिवाळी गवत, गाजर गवत, रेशीम काटा या प्रजाती काढल्या जातात.

नवीन गवताळ प्रदेशातील पर्यावरणाच्या स्थितीची पाहणी करण्यासाठी चंद्रपुरातील अभ्यासक व अशासकीय संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी १९ फेब्रुवारी रोजी गाभा क्षेत्राला भेट दिली. नव्याने विकसित झालेल्या गवताळ प्रदेशात विविध आकारप्रकारच्या वन्यजीवांसाठी आवश्यक चर, लपण्याच्या आणि प्रजननासाठीच्या जागा निर्माण झाल्या आहेत. लहान, मध्यम आणि उंच असे तीन प्रकारचे गवत या गावांच्या क्षेत्रात वाढले आहे. या वाढलेल्या गवतांमुळे वन्य प्राण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या परिसरात दोन-तीन हजार सांबर, चितळ पाहावयास मिळतात. तृणभक्षक प्राण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे अन्नसाखळीतील सर्वोच्च भक्षक असलेल्या वाघ, बिबट्यांची संख्या वाढली आहे, असे निरीक्षण वन्यजीव अभ्यासकांनी नोंदवले आहे.

**स्रोत** – 'ताडोबात वाघ ८७ तर बिबट १२८; काळा बिबट विशेष आकर्षण', *www.loksatta.com*, ०४.०३.२०२३.
'ताडोबातील गावांच्या स्थलांतरणामुळे वन्य प्राण्यांची संख्या वाढली; वाघांच्या संख्येतही भर', *www.loksatta.com*, २१.०२.२०२३.
'ताडोबा व्याघ्र प्रकल्प दुर्मिळ गवताने संपन्न; २४ प्रकारच्या गवतांमुळे जंगलाच्या समृद्धीत भर', *www.loksatta.com*, २१.०२.२०२३.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात एका वर्षात १४ वाघ व सात बिबट्यांचा मृत्यू

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात गेल्या एका वर्षात विविध कारणांमुळे १४ वाघ आणि सात बिबट्यांचा मृत्यू झाला. चंद्रपूर जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यांमध्ये ४४ आणि

बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये सात व्यक्तींचा मृत्यू झाल्याची माहिती राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मार्च महिन्यात विधानसभेत लेखी उत्तरात दिली.


अपघातात दोन वाघ, चार बिबटे, पाच चितळ, दोन नीलगाई, दोन अस्वलांचा मृत्यू झाला. एक वाघ, पाच चितळ, तीन रानडुक्करे व दोन सायाळां-(पॉर्क्युपाईन)ची शिकार झाली अशी आकडेवारी त्यांनी लेखी उत्तरात दिली आहे.

**स्रोत** – 'वर्षभरात वाघाच्या हल्ल्यात ४४ जणांचा मृत्यू; वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची विधानसभेत माहिती', *maharashtratimes.com*, २१.०३.२०२३.

**ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात प्रायोगिक तत्त्वावर 'अलर्ट सिस्टिम कॅमेरा'**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रात येणाऱ्या सीतारामपेठ गाव संकुलात प्रायोगिक तत्त्वावर सुमारे २० 'अलर्ट सिस्टीम कॅमेरे' बसवण्यात येणार आहेत. इंटरनेटशी जोडलेल्या या यंत्रणेच्या सहाय्याने वाघ, बिबट्या या वन्य प्राण्यांची हालचाल गाव परिसरात दिसताच ताडोबा प्रशासन तात्काळ गावकऱ्यांना सावधानतेचा इशारा देणार आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास इतर गावांमध्येही ही यंत्रणा बसवण्यात येईल.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात ८५ हून अधिक वाघ आहेत. गाभा क्षेत्रात २७, बफर क्षेत्रात ३४ आणि दोन्ही भागात वावरणारे २४ वाघ आहेत. वाघांशिवाय १२५ हून अधिक बिबटे आहेत (पान क्र. ६ वरील वृत्त पाहा) आणि अस्वलांची संख्याही लक्षात घेण्याजोगी आहे. ताडोबा विभागातील गावांमध्ये अनेकदा वन्य प्राण्यांचा वावर असतो. अनेक वेळा माणूस आणि वन्य प्राणी समोरासमोर येतात आणि अनुचित घटना घडतात. अशा घटना टाळण्यासाठी ताडोबा प्रशासनाने सुमारे २५ लाख रुपये खर्चून अलर्ट सिस्टीम कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेतला आहे.



**स्रोत** – 'मानव-वन्यजीव संघर्ष! ताडोबात 'अलर्ट सिस्टीम कॅमेरे' लागणार', *www.loksatta.com*, २२.०२.२०२३.

## तुंगारेश्वर अभयारण्य

**तुंगारेश्वर मंदिराच्या मार्गावर दोन पुलांच्या बांधकामासाठी आराखडा तयार**

तुंगारेश्वर पर्यटन स्थळ व महादेव मंदिर या दिशेने जाणाऱ्या मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभाग दोन नवीन पूल बांधणार आहे.

तुंगारेश्वर महादेव मंदिराकडे जाण्याची वाट पाण्याच्या प्रवाहाच्या मार्गातून जाते. पावसाळ्यात इथे पाण्याचा मोठा प्रवाह असतो. पावसाळा उलटल्यावरही वाटेवरच्या सखल भागात पाणी साचून राहिलेले असते. त्यामुळे या भागात पूल बांधण्याची मागणी देवस्थानाच्या विश्वस्त मंडळाने वन विभागाकडे केली होती.

संबंधित भागाची पाहणी करून वसई सार्वजनिक बांधकाम आणि वन विभागाने पुलांचा आराखडा तयार केला आहे. त्यात ३० फूट लांबीचे दोन पूल प्रस्तावित आहेत. त्यासाठी एक कोटी ६५ लाख रुपये निधीचे अंदाजपत्रक तयार करून ते डिसेंबर २०२२ मध्ये पालघर नियोजन समितीकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहे. मंजुरी मिळताच दोन्ही पुलांचे काम केले जाईल, असे बांधकाम विभागाने सांगितले.

**स्रोत** – 'तुंगारेश्वर पर्यटनस्थळ मार्गावर दोन नवीन पूल ; एक कोटी ६५ लाखांचा प्रस्ताव', *www.loksatta.com*, ०७.०१.२०२३

**नागझिऱ्यातून जाणाऱ्या महामार्गावरील वन्य प्राण्यांसाठीच्या भुयारी मार्गाचे काम संथ गतीने**

नागझिरा इथून जाणाऱ्या लाखनी-साकोली राष्ट्रीय महामार्ग ५३ (जुना राष्ट्रीय महामार्ग ६) वरील वन्यजीव भुयारी मार्गाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असतानाच मोहघाटाजवळ बांधकामाच्या ठिकाणी सलग दोन दिवस वाघ वावरताना दिसला.

बांधकामाच्या ठिकाणी वाघ दिसल्यामुळे हा वन्य प्राण्यांचा महत्त्वाचा भ्रमणमार्ग असल्याचे स्पष्ट झाले आहे, असे वन्यजीव संरक्षण व संवर्धनासाठी कार्यरत जाणकारांनी सांगितले. अलीकडेच २३ हत्तींच्या कळपानेही या भ्रमणमार्गाद्वारे राष्ट्रीय महामार्ग ओलांडून नागझिऱ्याला जाण्याचा प्रयत्न केला. नोव्हेंबर २०२२ मध्ये एका बिबट्याचा इथे रस्ते अपघातात मृत्यू झाला, या घटनांकडे त्यांनी लक्ष वेधले. भुयारी मार्गाचे काम लवकर पूर्ण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

राष्ट्रीय महामार्ग ५३ वरील वाघांच्या भ्रमणमार्गात वन्य प्राण्यांसाठी भुयारी मार्ग बांधण्याची मागणी भंडारा जिल्ह्याच्या मानद वन्यजीव रक्षकांनी केली आहे. नवेगाव, उमरेड पवनी कऱ्हांडला, मेळघाट, पेंच, बोर, सातपुडा, कान्हा आणि ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाला हा भ्रमणमार्ग जोडतो. हा भ्रमणमार्ग वनविकास महामंडळाच्या अखत्यारित येत असून तो वन विभागाला हस्तांतरित करावा आणि नागझिरा बफर क्षेत्राचा त्यात समावेश करावा, अशी ही मागणी आहे.

'वाइल्डलाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया' आणि 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'च्या अहवालानंतर, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मोहघाटासह मध्य भारतातील पाच वन्यजीव भ्रमणमार्गांमध्ये भुयारी मार्ग बांधण्यास सुरुवात केली आहे. सिरपूर नवाटोला, मरमजोब- डोंगरगाव, बाम्हणी- डुग्गीपार आणि साकोली- मुंडीपार अशा ठिकाणी भुयारी मार्ग बांधले जाणार आहेत.

**स्रोत** - कविता नागापुरे. 'वन्यजीव भुयारी मार्गाचे काम संथ गतीने, आता बघतोच! चक्क वाघोबांनी केली कामाची पाहणी; दोन दिवस बांधकामावर ठेवली पाळत!', *www.loksatta.com*, ०५.०२.२०२३.

**कोका अभयारण्यातील टी-१३ वाघाचा मृत्यू विषबाधेमुळे; तिघांना अटक**

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पांतर्गत येणाऱ्या कोका वन्यजीव अभयारण्यातील टी-१३ या वाघाचा मृत्यू विषबाधेने झाल्याचे शवविच्छेदनात स्पष्ट झाले. या प्रकरणी मार्च अखेरीस तीन आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून सात वाघनखे, मणक्याचे हाड, एका पायाचे हाड व अन्य साहित्य जप्त करण्यात आले.

कोका अभयारण्यात २६ मार्च रोजी टी-१३ वाघाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत दिसून आला होता. या प्रकरणी वन विभागाने गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. शवविच्छेदनाच्या अहवालानुसार या वाघाचा मृत्यू विषबाधेमुळे झाल्यावर तपास करून कोका अभयारण्याच्या वनाधिकाऱ्यांनी लाखनी तालुक्यातील परसोडी इथल्या दोघांना अटक केली. चौकशीदरम्यान आणखी एक जण वाघाच्या शिकारीत सहभागी असल्याचे उघड झाल्यामुळे त्यालाही अटक करण्यात आली. या प्रकरणात अधिक तपास सुरू आहे.

**स्रोत** - 'कोकामधील वाघाचा मृत्यू विषबाधेने; शवविच्छेदन अहवालातून माहिती उघड, आरोपींना अटक', *maharashtratimes.com*, ०१.०४.२०२३.

**नवेगाव नागझिऱ्याजवळ तस्करांना अटक; प्राण्यांच्या अवशेषांसह जिवंत मोर जप्त**

गोंदिया जिल्ह्यात वन्य प्राण्यांच्या अवयवांची तस्करी व विक्री होणार असल्याची माहिती विशेष व्याघ्र संरक्षण दल व नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील अधिकाऱ्यांना

मिळाली होती. त्यानुसार वनाधिकाऱ्यांनी पोलिसांसह २६ फेब्रुवारीला कारवाई केली. तेव्हा, मंगेझरी आणि पालांदूर इथे छापे घालून मृत वन्य प्राण्यांचे अवशेष, देशी दारू आणि रोख रक्कम जप्त केली.

या प्रकरणी मंगेझरी आणि पालांदूरचे रहिवासी असलेल्या पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडे वाघ किंवा बिबट्याचे दोन दात, एक नख, अस्वलाची तीन नखे, रानडुक्कराचे १० सुळे, चितळाचे एक शिंग, सायाळा-(पॉर्क्युपाईन)चे काटे, खवल्यामांजरा-(पँगोलीन)चे खवले, एक जिवंत मोर, मोरपिसे, गव्याचे एक शिंग, जाळे, सुकलेली हाडे, रक्त पापडी (झाडाची साल), सुकवलेले मांस, २२ पेटी देशी दारु (अंदाजे किंमत रु. ८४,०००) आणि २१,४९,४४० रुपये रोख रक्कम मिळाली. तपासात आरोपींनी काळ्या बिबट्याची शिकार केल्याचेही उघड झाले. पाचही आरोपींविरोधात वन्यजीव संरक्षण कायद्यान्वये वनगुन्हा नोंदवण्यात आला.

दरम्यान, आरोपींकडून जप्त करण्यात आलेली रोख रक्कम दारू विक्रीतील नसून वन्य प्राण्यांच्या अवयवांच्या व्यवहारातून मिळाली असावी, असा संशय पोलिसांना आहे. त्या दिशेने अधिक तपास सुरू आहे.

**स्रोत** – 'वन्य प्राण्यांच्या अवयवांची तस्करी, जिवंत मोरासह विविध प्राण्यांचे अवयव जप्त; पाच आरोपींना अटक', *www.loksatta.com*, २७.०२.२०२३.

## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प / पेंच व्याघ्र प्रकल्प

### खाणीमुळे धोक्यात येणार पेंच आणि नवेगाव नागझिऱ्याला जोडणारा भ्रमणमार्ग

सरकारी मालकीच्या मँगनीज ओर इंडिया लिमिटेड (मॉईल)च्या योजनेमुळे पेंच आणि नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पांदरम्यानचा भ्रमणमार्ग धोक्यात येणार आहे.

नागपूर जिल्ह्यात रामटेक तालुक्यातील गुगुलडोह इथे मँगनीजच्या खाणीचा प्रस्ताव आहे. भंडारा जिल्ह्यातील तुमसर इथल्या चिखला खाणीचा विस्तार करण्याची मॉईलची योजना आहे. मात्र, चिखलाजवळच्या परिसरात वाघ, बिबटे आणि वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत अधिसूची एकमधील इतरही वन्य प्राण्यांचा अधिवास आहे. या खाण प्रकल्पामध्ये १०५ हेक्टर क्षेत्राचा समावेश असून १०० हेक्टर जंगल आहे. पर्यावरण मंजुरी मिळविण्यासाठी १४ फेब्रुवारी रोजी जनसुनावणी होणार होती, मात्र याबाबत पुढील वृत्त उपलब्ध झाले नाही.

दरम्यान, या खाण प्रकल्पाला राज्य वन्यजीव मंडळ आणि राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने दिलेल्या मंजुरीबाबत वन्यजीव अभ्यासकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

**स्रोत** – 'सरकारला वाघांची नाही तर, वाघांच्या अधिवासातील खाण प्रकल्पांची चिंता', *www.loksatta.com*, ३१.०१.२०२३.

## पेंच व्याघ्र प्रकल्प

### पेंचमध्ये नागरिकांच्या सहभागाने फुलपाखरू सर्वेक्षण



पेंच व्याघ्र प्रकल्पात झालेल्या फुलपाखरू सर्वेक्षणात १२९ प्रजातींची नोंद झाल्याचे प्राथमिक निरीक्षण आहे. या सर्व नोंदीची शास्त्रीय पडताळणी केल्यानंतर अंतिम आकडेवारी जाहीर करण्यात येईल. पेंच व्याघ्र प्रकल्प आणि तिनसा इकॉलॉजिकल फाऊण्डेशन यांच्या सहयोगाने नागरिकांना सहभागी करून घेत हे सर्वेक्षण करण्यात आले.

पेंचमध्ये १० ते १२ मार्च या कालावधीत झालेल्या सिटीझन सायन्स प्रकारच्या या उपक्रमात ११ राज्यांतील १०५ नागरीक सहभागी झाले होते. पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या सात वनपरिक्षेत्रातील ४२ वनकुटींच्या क्षेत्रात सर्वेक्षण करण्यात आले. त्यात ४९ नव्या नोंदींसह १२९ प्रजातींची नोंद झाल्याचे प्राथमिक निरीक्षण मांडले आहे.

या नोंदी पूर्वीच्या छायाचित्रांशी पडताळून मग अंतिम निरीक्षणे मांडली जाणार आहेत. सर्वेक्षणादरम्यान आढळलेल्या इतर कीटकांच्या नोंदीही घेण्यात आल्या.

व्याघ्र प्रकल्पात आढळणाऱ्या फुलपाखरांच्या प्रजातींविषयी मूलभूत नोंदींचा संग्रह करण्यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले. वेगवेगळया ऋतूंमध्ये असे सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यातून फुलपाखरांच्या विविध प्रजातींच्या जीवनचक्राविषयी माहिती मिळेल.

**स्रोत** – 'पेंचमध्ये आढळल्या १२९ फुलपाखरू प्रजाती; सिटीझन सायन्स पद्धतीने झाले सर्वेक्षण', *maharashtratimes.com*, १६.०३.२०२३.

## माथेरान पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र

### वणवा प्रतिबंधक तंत्रासाठी 'सगुणा रूरल फाऊण्डेशन'ला वनश्री पुरस्कार; माथेरानात यशस्वी चाचणी

सगुणा रूरल फाऊंडेशनची मनुष्यरहीत वणवा प्रतिबंधक यंत्रणा 'सगुणा वनसंवर्धन तंत्रा'ला महाराष्ट्र वन विभागाच्या वनश्री पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. सामाजिक वनीकरणास हातभार लावणाऱ्या संस्थांचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो.

माथेरानच्या डोंगरावर वन विभागाच्या जागेत मनुष्यरहीत वणवा प्रतिबंधक यंत्रणेचा प्रयोग सगुणा रूरल फाऊंडेशनने केला. डोंगरावर तणनाशक फवारणी करून वणव्याच्या आगीला रोखण्याची ही पद्धत आहे.

हाच प्रयोग पुढे कल्याण कसारा रेल्वेमार्गावर आसनगाव भागात रेल्वे रूळाशेजारी वणवे पेटत होते तिथे राबवण्यात आला. यामुळे सामाजिक वनीकरणास फायदा झाला. त्यामुळे हे तंत्र विकसित करण्यात सगुणा रूरल फाऊंडेशनच्या चंद्रशेखर भडसावळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना यावेळी छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्काराने गौरवण्यात आले. २०१९ या वर्षाचा हा पुरस्कार यंदा देण्यात आला.

**स्रोत** - 'त्या वणवा प्रतिबंध तंत्राला वनश्री पुरस्कार; सगुणा वनसंवर्धन तंत्राचा गौरव, पालकमत्र्यांच्या हस्ते पुरस्कार', *www.loksatta.com*, ०९.०२.२०२३.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प

### मेळघाटात दोन शेतकरी महिलांवर अस्वलांचा हल्ला

मेळघाटातील जांबू गावात आदिवासी महिला शेतात काम करत असताना तीन अस्वलांनी त्यांच्यावर हल्ला केला. त्यात दोन महिला गंभीर जखमी झाल्या. जखमीं महिलांना तातडीने धारणी इथल्या उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले.

अस्वलांनी हल्ला केल्यावर या महिलांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. आरडाओरडा ऐकून शेजारील शेतातील लोक धावत आले. त्यांनी त्या महिलांची अस्वलाच्या तावडीतून सुटका केली. घटनेची माहिती मिळताच धारणी वन परिक्षेत्र अधिकारी व त्यांच्या पथकाने मदतकार्य केले. मात्र या हल्ल्यामुळे जांबू व जंगलालगतच्या सुमारे १२ गावांतील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

**स्रोत** – 'तीन अस्वलांचा महिलांवर हल्ला, गंभीर जखमी अवस्थेत...; मेळघाटच्या १२ गावातील शेतकऱ्यांमध्ये दहशत', *www.loksatta.com*, १४.०३.२०२३.

### मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात प्रकल्पग्रस्तांसाठी आंदोलनाचा आमदाराचा इशारा

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या स्थापनेला २२ फेब्रुवारी रोजी ५० वर्षे पूर्ण झाली; मात्र त्यानिमित्त मेळघाटात एकही कार्यक्रम झाला नाही. सत्तारूढ आघाडीतील प्रहार जनशक्ती पक्षाचे मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल यांनी या दिवशी मेळघाट प्रकल्पग्रस्तांसाठी आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या स्थापनेनंतर हळूहळू त्याचा विस्तार करण्यात आला. आता मेळघाटमधील मोठ्या भौगोलिक क्षेत्रात व्याघ्र प्रकल्पाची व्याप्ती आहे. मात्र, व्याघ्र प्रकल्पामुळे मेळघाटातील अनेक रस्त्यांचे काम व रस्ते, पुलांचे प्रस्ताव रखडले आहेत. त्यामुळे मेळघाटात आरोग्य सुविधा पुरवण्यात अडचणी येतात. कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यूचा प्रश्न आहे. अनेक खेडूयांमध्ये वीज पोहचलेली नाही. वीज वितरणाचे प्रस्ताव व्याघ्र प्रकल्पाकडे अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. पाणी पुरवठा योजनांना परवानगी मिळत नसल्याने अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. या समस्या पटेल यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिलेल्या पत्रात मांडल्या आहेत.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अनेक गावांचे पुनर्वसन अन्यत्र करण्यात आले. पण, त्या ग्रामस्थांना अजूनही नियमानुसार घरांचे मूल्यांकन, रस्ते, पिण्याचे पाणी आणि इतर मुलभूत सुविधा पुरवण्यात आलेल्या नाहीत. वन गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये अनेकांना अडकवून त्यांना तुरुंगात डांबण्यात आले, त्यामुळे सर्वसामान्यांमध्ये व्याघ्र प्रकल्पाविषयी असंतोष निर्माण झाला आहे, या सर्व बाबींकडे आमदार पटेल यांनी लक्ष वेधले आहे. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ४ अंक १*)

**स्रोत** -'आमदाराचा कोप आणि....मेळघाट व्याघ्र प्रकल्पात पसरली होती भयाण शांतता', *www.loksatta.com*, २४.०२.२०२३.




'मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमावर निषेधाचे सावट, सत्तारूढ गटातील आमदारच करणार आंदोलन', *www.loksatta.com*, १७.०२.२०२३.

## यावल अभयारण्य

### यावल अभयारण्यात वनस्पतींच्या तीन नव्या प्रजाती

जळगाव जिल्ह्यातील यावल अभयारण्यातून अंजिरी चारुशिखी, हिरवा लगाम, सोनआमरी या तीन प्रजातींची नोंद झाली आहे. वनस्पती अभ्यासक राहुल सोनवणे व प्रसाद सोनवणे यांनी शोधून काढलेल्या या प्रजातींच्या नोंदी बायोइन्फोलेट या विज्ञानपत्रिकेत प्रसिद्ध झाल्या आहेत.

यावल अभयारण्यातील अधिवासाचे संरक्षण व संवर्धन होणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीत अभयारण्यात केवळ दोन वनपाल व दोन वनरक्षकांची नियुक्ती आहे. अभयारण्याच्या संरक्षणासाठी हे मनुष्यबळ पुरेसे नाही, याकडे संशोधकांनी लक्ष वेधले आहे.

**स्रोत** - 'यावल अभयारण्यात अंजिरी चारुशिखी, हिरवा लगाम, सोनआमरीची नोंद, वनस्पती अभ्यासक राहुल, प्रसाद सोनवणेंचे संशोधन', *www.loksatta.com*, २३.०१.२०२३.

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्प

### "लांबलेले पुनर्वसन स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात तरी करा," सह्याद्री व्याघ्र प्रकल्पग्रस्तांची मागणी

सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील वेळे ढेण गावाने लांबलेले पुनर्वसन देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात तरी व्हावे, अशी मागणी केली आहे. कोयना अभयारण्य व सह्याद्री व्याघ्र प्रकल्पग्रस्त पुनर्वसन समन्वय समितीच्या अध्यक्षांनी ग्रामस्थांच्या वतीने ही मागणी केली आहे.

वेळे ढेण गावासह जावळी तालुक्यातील अन्य काही गावे व पाटण तालुक्यातील काही गावे अशा १२ गावांचा १९८५ मध्ये कोयना अभयारण्यात समावेश झाला. त्यातील पाटण तालुक्यातील पाच गावांचे कऱ्हाड आणि पलूस तालुक्यांत, तर जावळी तालुक्यातील पाच गावांचे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी परिसरात पुनर्वसन झाले. मात्र,

सुमारे २०० लोकसंख्या असलेल्या वेळे ढेणच्या पुनर्वसनाचे भिजत घोंगडे पडले आहे.

वेळे ढेणच्या पुनर्वसनासाठी पनवेल तालुक्यातील पळस्पे इथे जमीन निश्चित करण्यात आली होती. मात्र, त्यातील काही क्षेत्र रस्त्यांसाठी आणि काही क्षेत्र आदिवासींना दिले गेल्यामुळे तिथे संपूर्ण गावाचे पुनर्वसन करणे शक्य झाले नाही. त्यानंतर ६१ खातेदारांनी खंडाळा तालुक्यातील भोळी, धनगरवाडी इथे पुनर्वसनाची मागणी केली, तर १६ खातेदारांची पूर्वीपासून पळस्पे इथे पुनर्वसनाची मागणी कायम आहे.



**स्रोत** - डॉ. प्रमोद फरांदे. 'वन्यप्राण्यांच्या भीतीतच उजाडतो दिवस; व्यथा ढेण ग्रामस्थांची', *www.esakal.com*, ३१.०१.२०२३.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात रस्टी स्पॉटेड कॅटसाठी संवर्धन केंद्र तयार



संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात रस्टी स्पॉटेड कॅट (वाघाटी) या मार्जार कुळातील सर्वात लहान आकाराच्या प्रजातीसाठी प्रजनन आणि संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. केंद्रातील आठही पिंजऱ्यांचे काम पूर्ण झाले आहे. सध्या इथे तीन वाघाटी असून राज्यासह देशात आढळणाऱ्या या प्रजातीच्या मांजरी या केंद्रात आणण्याचे आवाहन उद्यान प्रशासनाने केले आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात २००९-१० पासून वाघाटीचे प्रजनन आणि संवर्धन करण्यास सुरुवात झाली. मात्र, या प्रकल्पाला फारसे यश मिळाले नाही. हे संवर्धन केंद्र वाघांच्या पिंजऱ्याच्या परिसरात असून वाघाच्या वासामुळे वाघाटी प्रजनन करत नसल्याची शक्यता व्यक्त केली जात होती. त्यामुळे आता उद्यानातील नव्या ठिकाणी संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रातील पिंजऱ्यांमध्ये वाघाटीच्या नैसर्गिक अधिवाससदृश स्थिती निर्माण करण्यात आली आहे, अशी माहिती राष्ट्रीय उद्यानातील अधिकाऱ्यांनी दिली.

सध्या या केंद्रात २०१७ मध्ये पुण्याहून आणलेली पाच वर्षांची नर-मादी जोडी आणि सांगलीमधील शिराळा इथून आलेले तीन महिन्याचे एक पिल्लू आहे.

दरम्यान, साताऱ्यातील कराड इथे उसाच्या शिवारात सापडलेली वाघाटीची दोन पिल्ले सध्या सातारा वन विभागाकडे आहेत. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ४ अंक १*) ही पिल्ले मोठी झाल्यावर त्यांनाही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील संवर्धन केंद्रात आणण्याची योजना आहे, असे वनाधिकाऱ्यांनी सांगितले.

इंटरनॅशनल युनिअन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर (IUCN) च्या धोकाग्रस्त प्रजातींची यादी – रेड लिस्टमध्ये रस्टी स्पॉटेड कॅट 'नीअर थ्रेटण्ड' अर्थात अस्तित्वाला धोका निर्माण होण्याच्या पातळीवर असल्याचे नमूद केले आहे.

**स्रोत** – 'वाघाटीचे आठही पिंजरे उभे ; संवर्धन केंद्रात तीन वाघाटीचे संगोपन', *www.loksatta.com*, २१.०१.२०२३.

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून बोगद्यासाठी पर्यावरणीय मंजुरी अनावश्यक – केंद्र सरकार

ठाणे व बोरिवलीदरम्यान संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या खालून जाणाऱ्या नियोजित भुयारी मार्गाला पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याचे केंद्र आणि राज्य शासनाच्या पत्रव्यवहारानंतर स्पष्ट झाले आहे.

या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या वन जमिनीच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री इथे उमरावतीमध्ये ६० हेक्टर जागा वन विभागाला देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आता या प्रकल्पाचा खर्च ११,००० कोटी रुपयांवरून १६,६०० कोटी रुपये इतका झाला आहे.

ठाणे ते बोरिवली दरम्यान घोडबंदरमार्गे २३ किमी अंतर आहे. ठाणे ते पश्चिम उपनगरांदरम्यान प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून बोगदा करण्यात येणार असून त्यामुळे हे अंतर १२ किमी होईल.

बोगद्याचा भाग संरक्षित वनक्षेत्रातून जात असल्यामुळे बोगद्याच्या खोदकामासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यासंदर्भात 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ रॉक मशिन्स' या संस्थेचा अभिप्राय घेण्यात आला. या संदर्भात चर्चा करून ११.८५ किमी लांबीचा हा प्रकल्प तयार करण्यात आला असून त्यामध्ये १०.२५ किमी बोगदा आणि १.५५ किमी लांबीचा जोडरस्ता प्रस्तावित आहे. बोगद्याचा बाह्य व्यास १३.५ मी इतका असेल.या प्रकल्पासाठी ४९.४८ हेक्टर भूसंपादन करावे लागणार असून त्यामध्ये ३७.६३ हेक्टर सरकारी वन क्षेत्र आणि ११.९१ हेक्टर खासगी जमीन आहे.

ठाणे ते बोरिवली अशा सहा पदरी रस्त्यासाठी दोन बोगद्यांचे काम वर्ष २०१५ मध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास कंपनीने हाती घेतले होते. प्रकल्पाला सल्लागार म्हणून एइकॉम एशिया कंपनीची नेमणूक करण्यात आली होती. २०२०मध्ये हा प्रकल्प मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आला.

**स्रोत** – 'ठाणे ते बोरिवली अंतर पार करण्यासाठी आता भुयारी बोगदा, नागरिकांचा प्रवासाचा वेळ वाचणार', *maharashtratimes.com*, ०४.०४.२०२३.

**येऊरमध्ये मातीवाहू गाड्यांना प्रवेश देण्यासाठी वनाधिकाऱ्यानेच मागितली लाच**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र असलेल्या येऊरच्या जंगलातील टेकडीवर मुरूम माती वाहून नेण्यासाठी वन विभागाच्याच कर्मचाऱ्याने लाच मागितल्याचा प्रकार उघड झाला आहे.

तक्रारदार २३ जानेवारीला येऊरच्या टेकडीवर मुरुमाने भरलेल्या गाड्या नेत होते. त्यावेळी उपवन इथल्या येऊरच्या प्रवेशद्वारावर वन परिमंडळ अधिकारी विकास कदम यांनी त्यांच्याकडून प्रत्येकी ६०० असे १० गाड्यांचे एकूण ६,००० रुपये मागितले. त्यानंतर तक्रारदाराने ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. विभागाने या प्रकरणाची खातरजमा केल्यानंतर सापळा रचून कदम याला ताब्यात घेतले.

**स्रोत** – 'येऊरच्या संवेदनशील क्षेत्रात गाड्याची वाहतूक करण्यासाठी वन विभागाच्या कर्मचाऱ्याकडूनच लाचेची मागणी', *www.loksatta.com*, ३१.०१.२०२३.

**रात्रीचे बेकायदा समारंभ, क्रीडा स्पर्धांमुळे येऊरमध्ये ध्वनी आणि प्रखर प्रकाशाचे प्रदूषण**

येऊरच्या जंगलातील ढाबे, हॉटेल्स आणि खासगी बंगल्यांमधील लग्नसमारंभ, राजकीय नेत्यांचे वाढदिवस, त्यानिमित्ताने झडणाऱ्या मेजवान्यांमधील कानठळ्या बसवणाऱ्या संगीतामुळे येऊरचे पर्यावरण धोक्यात आले आहे. बेकायदा टर्फ क्लबमधील प्रखर प्रकाशझोतात रात्री उशिरापर्यंत सुरू असणारे क्रिकेट आणि फुटबॉलच्या सामन्यांमुळे येऊर क्षेत्रातील प्राणी, पक्ष्यांचा अधिवास धोक्यात आल्याच्या तक्रारी काहींनी केल्या आहेत. पूर्वी रात्रीच्या वेळी दिसणारे घुबड, वटवाघुळे, टिटवी आदी पशुपक्षी दिसनासे झाल्याचे निरीक्षण स्थानिक रहिवाशाने नोंदवले आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र - येऊरमध्ये नियमानुसार सायंकाळी ६

वाजल्यानंतर ग्रामस्थांव्यतिरिक्त इतरांना प्रवेशबंदी आहे. मात्र, या साऱ्या प्रकारांकडे ठाणे महानगरपालिका आणि वन विभाग पद्धतशीर दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप पर्यावरणवादी कार्यकर्त्यांनी केला आहे. मात्र, येऊरचा काही भाग हा ठाणे महानगरपालिकेच्या अखत्यारीत असल्याने कारवाई करण्यासाठी वन विभागाला अडचणी येतात, असे एका वनाधिकाऱ्याने सांगितले.

**स्रोत** - किशोर कोकणे. 'येऊरच्या जंगलात राजमान्य गोंधळ; मेजवान्यांमधील कर्णकर्कश संगीतामुळे पर्यावरण धोक्यात', *www.loksatta.com*, ३१.०१.२०२३.

### आरेतील १७७ झाडे तोडण्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मुंबई मेट्रोला दंड ठोठावला

आरे वसाहतीमधील ८४ झाडे कापण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिलेली असताना मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (MMRCL) ने १७७ झाडे तोडण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाकडे परवानगी मागितली. त्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने १७७ झाडे तोडण्याची परवानगी दिली. मात्र, न्यायालयाच्या आदेशाचा भंग केल्याबद्दल MMRCL ला १० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

मेट्रो ३ (कुलाबा-वांद्रे- सीप्झ) मार्गिकेतील आरे कारशेडसाठी आरे वसाहतीतील झाडे तोडण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली होती. मात्र, राज्य सरकारने कारशेडचे स्थान पुन्हा आरे वसाहतीत निश्चित केल्यावर MMRCL ने २०२२ मध्ये ८४ झाडे तोडण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची परवानगी मागितली. नोव्हेंबर २०२२ मध्ये न्यायालयाने ८४ झाडे तोडण्याची परवानगी दिली.

त्यानंतर MMRCL ने वृक्ष प्राधिकरणाकडे अर्ज केला आहे. मात्र या अर्जात ८४ ऐवजी १७७ झाडे तोडण्याची परवानगी मागितली आहे. त्यातही ही झाडे नेमकी कोणती आणि कुठे आहेत, अशी कोणतीही माहिती दिलेली नाही. तसेच कोरोना संक्रमणाचे कारण देत प्राधिकरणाने यावर सूचना/हरकती ई –मेलद्वारे मागवल्या आहेत. त्यामुळे MMRCL राज्य सरकार, न्यायालय आणि नागरिकांची दिशाभूल करत आहे, असे वनशक्ती संस्थेने म्हटले आहे.

**स्रोत** - 'आरे वसाहतीमधील ८४ नव्हे, तर १७७ झाडांवर कुऱ्हाड?', *www.loksatta.com*, १९.०१.२०२३.
आर्या रोहिणी. 'SC slaps Rs. 10 lakh fine on Mumbai metro, but permits felling of 177 trees in Aarey forest', *https://www.downtoearth.org.in/*, १७.०४.२०२३.

## प्रादेशिक बातम्या

### चार वर्षांत पँगोलीनच्या सर्वाधिक तस्करीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर

वन्यजीव संरक्षण अधिनियमाअंतर्गत अनुसूची एकमध्ये असलेल्या पँगोलीन (खवलेमांजर) च्या तस्करीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. TRAFFIC India आणि WWF India या संस्थांनी या प्राण्याच्या तस्करीचा अहवाल जाहीर केला.

गेल्या चार वर्षांत सर्वाधिक पँगोलीन ओदिशातून जप्त करण्यात आले असून त्यापाठोपाठ महाराष्ट्राचा क्रमांक आहे. जप्तीच्या ३४२ घटनांमध्ये वन्यजीव व्यापारासाठी १२०३ पँगोलीनची शिकार व तस्करी झाली आहे. त्यापैकी ओदिशातील जप्तीच्या ७४ घटनांमध्ये १५४ तर महाराष्ट्रातील ४७ घटनांमध्ये १३५ पँगोलीनचा समावेश आहे. यातील ५०% घटनांमध्ये जिवंत पँगोलीन जप्त करण्यात आली आहेत.

**स्रोत** – 'चीनचे असेही 'पँगोलीन' प्रेम; प्रेमासाठी वाट्टेल ते', *www.loksatta.com*, २४.०२.२०२३.


### कल्याण अहमदनगर महामार्गावर वन्य प्राण्यांच्या अपघातांच्या संभाव्य जागा ओळखण्याची मोहीम

वन्य प्राण्यांच्या अपघातांच्या संभाव्य जागा निश्चित करण्यासाठी कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावर

'फर्क' नावाची मोहीम सुरू करण्यात आली आहे. यात मोबाईल ऐपच्या मदतीने वन्य प्राण्यांच्या अपघातांच्या नोंदी ठेवता येणार आहेत. रस्ते रुंदीकरणाच्या वेळी वन्य प्राण्यांसाठी मार्गिका किंवा तत्सम उपाययोजना करता याव्यात, यासाठी नोंदींचा उपयोग होईल, असा त्यामागे हेतू आहे.

कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील पाच वनक्षेत्रांमध्ये 'अश्वमेध प्रतिष्ठान' आणि इंटॅक ठाणे यांनी एकत्र येऊन ही मोहीम हाती घेतली असून 'मनुसृष्टी फाऊंडेशन'च्या मदतीने या माहितीची मांडणी केली जाणार आहे. या नोंदींच्या विश्लेषणाचे काम 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'तील संशोधक मैत्रेयी विश्वास भावे करणार आहेत.

नोटकॅम किंवा तत्सम ऐप वापरून वन्य प्राण्यांच्या अपघाताचे फोटो काढून ते संकलित केले जाणार आहेत. यात ठिकाण, वेळ आणि भौगोलिक नोंद होते. ही नोंद वन विभागाकडेही होत असते. मात्र त्यात सातत्य ठेवण्याचा प्रयत्न या मोहिमेतून केला जाणार आहे.



**स्रोत** – 'वन्यजीवांचे अपघात रोखण्यासाठी फर्क अभियान; वन्यजीवांचे रस्त्यांवरील अपघात क्षेत्र शोधण्याची मोहीम', *www.loksatta.com*, ०९.०३.२०२३.

## कोकण

### गुहागरच्या किनाऱ्यावर दोन समुद्री कासवांना अंकन

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागरच्या समुद्र किनाऱ्यावर दोन ऑलिव्ह रिडले कासवांना २२ फेब्रुवारी रोजी उपग्रहाधारित अंकन करण्यात आले. राज्य वन विभागाचा कांदळवन कक्ष आणि वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया यांच्या सहयोगाने हा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

गेल्या वर्षी पाच ऑलिव्ह रिडले कासवांना उपग्रहाधारित अंकन करण्यात आले होते. मात्र, अंकनासाठी वापरलेली उपकरणे खराब निघाल्याने चार कासवांचा संपर्क तुटला होता. ज्या कंपनीकडून अंकनासाठी वापरलेली उपकरणे खरेदी करण्यात आली होती त्या कंपनीने दिलेल्या मुदतीच्या आतच ती उपकरणे खराब झाली. त्यावर लाखो रुपये खर्च करण्यात आले होते. कंपनीने अतिरिक्त पैसे न घेता नवीन उपकरणे दिली. त्यामुळे गतवर्षी अर्ध्यावर राहिलेल्या प्रकल्पाला यावर्षी पुन्हा नव्याने सुरुवात झाली आहे.

महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर ऑलिव्ह रिडले कासवांचे वीणीसाठी येण्याचे प्रमाण तुरळक आहे. आत्तापर्यंत या कासवांना भारतात फक्त पूर्व किनाऱ्यावर अंकन करण्यात आले आहे. पश्चिम किनाऱ्यावर गेल्या वर्षी पहिल्यांदाच अशा प्रकल्पाला सुरुवात करण्यात आली. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३ अंक १, खंड ३ अंक २, खंड ३ अंक ३*)

**स्रोत** – 'दुडुदुडू धावणाऱ्या कासवांच्या पाठीवर उपग्रह; समुद्रातील भ्रमणमार्ग शोधण्याचा प्रयत्न', *www.loksatta.com*, २३.०२.२०२३.

### डहाणूच्या किनाऱ्यावर येणाऱ्या कासवांच्या संख्येत घट झाल्याचा अंदाज

डहाणू किनारपट्टीवरील प्रदूषण, वाळू उपसा आणि वाढत्या मानवी हस्तक्षेपामुळे प्रजननासाठी किनाऱ्यावर येणाऱ्या समुद्री कासवांनी डहाणू समुद्र किनाऱ्याकडे पाठ फिरवली आहे. त्यांना प्रजननासाठी योग्य भाग सुरक्षित करण्याची गरज अभ्यासकांनी व्यक्त केली आहे.

फेब्रुवारी, मार्च महिन्यात समुद्री कासवे अंडी घालण्यासाठी समुद्रकिनाऱ्यावर येतात. कोकण किनारपट्टीवरील रायगड, रत्नागिरी, सिंधदुर्ग या जिल्ह्यांमधील किनाऱ्यांच्या तुलनेत पालघर जिल्ह्यातील किनाऱ्यांवर येणाऱ्या कासवांची संख्या कमी झाल्याचे

वृत्तात नमूद केले आहे. साधारण २० ते २५ वर्षांपूर्वी चिंचणी ते झाईदरम्यान साधारण ३५ किलोमीटरच्या समुद्रकिनाऱ्यावर कासवे अंडी देण्यासाठी येत. मात्र आता क्वचितच एखादे कासव इथे आल्याचे पाहायला मिळते.

डहाणू तालुक्यातील समुद्रकिनाऱ्यावर ११ मार्च रोजी ऑलिव्ह रिडले कासवाची मादी मृतावस्थेत आढळून आली होती. तिच्या पोटात अंडी असल्याचे तपासणीअंती दिसून आले होते. त्यामुळे ती अंडी देण्यासाठी किनाऱ्यावर आली असावी, असा अंदाज जाणकारांनी वर्तवला. या कासवाच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट झाले नाही.

**स्रोत** – कुणाल लाडे. 'डहाणू समुद्रकिनाऱ्यावरील कासवांची प्रजनन स्थळे धोक्यात', *www.loksatta.com*, १४.०३.२०२३.

## उत्तर महाराष्ट्र

### नाशिक जिल्ह्यातील गिधाडांना उपग्रहाधारित अंकन


नाशिकमधील गिधाडांच्या अभ्यासासाठी त्यांना उपग्रहाधारित अंकन करण्यात येणार आहे. पश्चिम वन विभागाला त्यासाठी मंजुरी मिळाली असून, गिधाडांच्या पाठीवर लवकरच उपकरणे बसवण्यात येतील.

गिधाडांचा प्रवास, उड्डाणाची उंची, विश्रांती स्थळे यांसह त्यांच्या जीवनशैलीचा अभ्यास करून त्यांच्या संवर्धनासाठी धोरण आखण्याकरता वन विभाग प्रयत्नशील आहे. नाशिक वन वृत्तातील पश्चिम विभागाने गिधाडांना अंकन करण्याची तयारी पूर्ण केली आहे.

नाशिकमध्ये या अभ्यासासाठी जखमी अवस्थेत अथवा आजारी स्थितीत आढळलेल्या गिधाडांवर उपचार केले जातील. त्यानंतर त्यांना निसर्गात मुक्त करताना अंकन केले जाईल. एकदा बसवले की उपकरण तीन वर्षांपर्यंत कार्यरत राहील, अशी ही उपकरणे आहेत.

दरम्यान, नाशिक जिल्ह्यात हरसूल इथे खोरीपाड्यात गिधाडांसाठी उपाहारगृह म्हणजे मोकळ्या जागेत त्यांच्यासाठी मेलेली गुरेढोरे आणून टाकण्याचा उपक्रम राबवण्यात येत आहे. जिल्ह्यातील वाघेरा घाट, म्हसरूळ वनराई, हरसूल, अंजनेरी आदी ठिकाणी पांढऱ्या पाठीच्या आणि लांब चोचीच्या जवळपास २५० गिधाडांचे वास्तव्य आहे.

जिल्ह्यात इजिप्शियन गिधाडेही दिसून आली आहेत. अंजनेरी परिसरात गिधाड प्रजनन केंद्र प्रस्तावित असून त्याचे काम लवकरच सुरू होणार आहे. यापूर्वी नाशिक पूर्व वन विभागाने एका गिधाडाला रिंग लावून अंकन केले आहे.



**स्रोत** – 'सॅटेलाईटद्वारे गिधाडांच्या प्रत्येक हालचालींवर नजर; 'स्वच्छतादूतां'च्या जीवनशैलीचाही अभ्यास', *maharashtratimes.com*, २७.०३.२०२३.

### माणूस व बिबट्या सहजीवनासाठी नाशिक जिल्ह्यात 'जाणता वाघोबा' उपक्रम


नाशिक जिल्ह्यात 'जाणता वाघोबा' उपक्रमांतर्गत ३० गावांमध्ये बिबट्या-माणूस सहजीवनाबाबत जागरुकता वाढवण्यात आली आहे. बिबट्यासमवेत सुरक्षितरित्या जगण्यासाठी प्रबोधन करण्याकरता 'बिबट्यादूतां'ची फौज तयार होत आहे. सध्या विल्होळी व आंबेबहुला या दोन गावांतून शंभर विद्यार्थी बिबट्यादूत म्हणून कार्य करत आहेत.

नाशिक पश्चिम वन विभाग, वाइल्डलाईफ कॉन्झर्वेशन सोसायटी आणि कॉन्झर्वेशन लिडरशीप प्रोग्रॅम यांच्यातर्फे 'जाणता वाघोबा' उपक्रम राबवला जात आहे. त्यामध्ये बिबट्या प्रवणक्षेत्रात नागरिकांचे सहजीवन कसे असावे यासंदर्भात प्रबोधन करण्यात येत आहे. त्यानुसार

रात्री शेतात जाताना काय करावे, परिसर स्वच्छ कसा ठेवावा, शाळेतून परत येताना काय करावे, बिबट्यांची पिल्ले दिसल्यास काय करावे, पाळीव प्राण्यांना सुरक्षित कसे ठेवावे, रात्री घराबाहेर झोपताना घ्यायची काळजी, घराचे दरवाजे कसे व कोणत्या दिशेला असावेत, शेतात बिबट्या दिसल्यास काय करावे, सर्वांना बिबट्याची भीती वाटते का, बिबट्या समोर आल्यास काय कराल, पिंजऱ्यात बिबट्या अडकवणे आणि दुसरीकडे सोडणे हा योग्य पर्याय आहे का, या प्रश्नांची तर्कशुद्ध उत्तरे नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात येत आहेत. तसेच बिबट्याचा बदललेला अधिवास, जीवनशैली, हल्ल्याचे कारण व पद्धतीबाबत विद्यार्थ्यांना सूचित केले जाते. चित्रफीत व छापलेले फलक देऊन विद्यार्थ्यांना घरी व गावात प्रबोधनासाठी तयार केले जात आहे.

वर्ष २०२० मध्ये नाशिकच्या दारणाखोऱ्यात बिबट्यांच्या हल्ल्यांत पाच व्यक्तींचा मृत्यू झाला. तिथल्या गावांचा अभ्यास केल्यानंतर ऊस शेतीमुळे हे हल्ले होत असल्याचे वन विभागाच्या लक्षात आले. त्यानंतर १२ बिबटे जेरबंद केल्यावर नागरिकांमधील जनजागृतीसाठी हा उपक्रम राबवण्याचा निर्णय झाला. यापूर्वी जुन्नरमध्ये हा प्रयोग यशस्वी झाल्याने नाशिकमधल्या संघर्षावरही हा उपक्रम परिणामकारक ठरेल, अशी वनाधिकाऱ्यांना आशा आहे. त्यानुसार वन विभागाने ग्रामस्थांशी चर्चा करून उपक्रमाला सुरुवात केली.

**स्रोत** - ''बिबट्यादूतां'ची फौज! संघर्ष निवारणासाठी ३० गावांत पोहोचला 'जाणता वाघोबा', काय आहे उपक्रम?', maharashtratimes.com, २६.०१.२०२३.



## माणूस-वाघ संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | स्रोत |
|---|---|---|---|
| गडचिरोली | आरमोरी | विहीरगावात शेतकरी युवकावर वाघाचा हल्ला; युवक थोडक्यात बचावला | लोकसत्ता, ०४.०३.२०२३ |
| | गडचिरोली शहर | कृषी महाविद्यालय परिसरात वाघ | लोकसत्ता, २०.०३.२०२३ |
| | वडसा | देसाईगंज – आरमोरी मार्गावर वाघिणीचा चार बछड्यांसह वावर | लोकसत्ता, २५.०२.२०२३ |
| चंद्रपूर | चंद्रपूर | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील मोहर्ली गावात वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार | लोकसत्ता, ०८.०२.२०२३ |
| | नागभीड | मांगली इथे वाघाच्या हल्ल्यात एकजण ठार | लोकसत्ता, २६.०२.२०२३ |
| | सावली | सामदा बूज इथे पिकाची पाहणी करणारा शेतकरी वाघाच्या हल्ल्यात गंभीर जखमी | लोकसत्ता, १३.०३.२०२३ |
| | सिंदेवाही | कच्चेपार इथे वाघाच्या हल्ल्यात गुराखी आणि बैल ठार | लोकसत्ता, २४.०२.२०२३ |
| भंडारा | मोहाडी | मांडेसर इथे शेतात दोन दिवस ठाण मांडलेली वाघीण जेरबंद | महाराष्ट्र टाइम्स, १९.०१.२०२३ |
| | | धोप इथे शेतात वाघ; वन विभागाने हुसकावून लावले | लोकसत्ता, ०८.०३.२०२३ |

## चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांचे स्थलांतर करणार - वन मंत्री

चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांचे राज्यात इतरत्र स्थलांतर केले जाणार आहे, अशी माहिती राज्याचे वन मंत्री आणि चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. सावली तालुक्यात आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते.

चंद्रपूर जिल्ह्यात माणूस-वन्यजीव संघर्ष तीव्र झाला आहे. वाघाचा अधिवास कमी पडत असल्यामुळे हद्द प्रस्थापित करताना होणाऱ्या झुंजीत वाघाच्या मृत्यूच्या घटनादेखील घडत आहेत. या पार्श्वभूमीवर चंद्रपूर जिल्ह्यातील वाघाचे दोन टप्प्यांत स्थलांतर करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात गोंदियातील नवेगाव-बांध, नागझिरा अभयारण्यात पाच वाघ स्थलांतरित करण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात सह्याद्री, मेळघाट, संभाजीनगर या तीन ठिकाणी २५ वाघ स्थलांतरित केले जाणार आहेत.

ही सर्व प्रक्रिया राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन ऑथॉरिटी)च्या नियमानुसार होणार आहे, असे मुनगंटीवार यांनी सांगितले. ब्रम्हपुरी वनक्षेत्रात मानव-वन्यजीव संघर्ष अधिक आहे. इथे वाघांची संख्या अधिक असल्याने या क्षेत्रातूनच सर्वांत जास्त वाघ स्थलांतरित केले जाणार असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सुनील लिमये यांनी मे २०२२ मध्ये मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर केला. त्यानंतर राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, केंद्रीय वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण यांच्याकडून स्थलांतराची परवानगी घेण्यात आली. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने ब्रम्हपुरी इथल्या पाच मादी वाघांना रेडिओ कॉलर लावण्याची परवानगी १५ सप्टेंबर २०२२ ला दिली.

**स्रोत** – 'चंद्रपुरातील वाघांचे दोन टप्प्यात स्थलांतरण; नवेगाव, नागझिरा, सह्याद्री, मेळघाट, संभाजीनगरला हलवणार २५ वाघ, वनमंत्री मुनगंटीवार यांची माहिती', *www.loksatta.com*, ०५.०३.२०२३.
'वाघांचे कृत्रिम स्थलांतरण लवकरच; महाराष्ट्रातील पहिला प्रयोग', *www.loksatta.com*, ०३.०३.२०२३.

## विदर्भात जानेवारी व फेब्रुवारीत आठ वाघांचा मृत्यू




देशात यंदा जानेवारी व फेब्रुवारी या दोन महिन्यांत ३४ वाघांचा मृत्यू झाला आहे. यात आठ वाघांचा मृत्यू महाराष्ट्रात झाला असून, पैकी सहा मृत्यू चंद्रपूर जिल्ह्यात झाले आहेत. 'नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन ऑथॉरिटी'च्या आकडेवारीतून हे दिसून आले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात अवघ्या ३८ दिवसांत ४ वाघांचा मृत्यू झाला. १४ जानेवारीला रात्री भद्रावती वन परिक्षेत्रांतर्गत माजरी इथे, तर ५ फेब्रुवारी रोजी पोंभुर्णा वन परिक्षेत्रामधील घोसरी नियतक्षेत्रात प्रत्येकी एका वाघाचा मृत्यू झाला. हे दोन्ही मृत्यू शेतकऱ्यांनी लावलेल्या विजेच्या जिवंत तारांचा स्पर्श झाल्यामुळे झाले. पोंभुर्णा इथल्या घटनेत शेतकऱ्याने वाघाचा मृतदेह लपवून ठेवला. या शेतकऱ्याला वन खात्याने अटक केली. तीन जानेवारी रोजी ब्रम्हपुरी तालुक्यातील मेंढकी इथे विहीरीत पडून वाघाचा मृत्यू झाला. चार जानेवारी रोजी सावली तालुक्यात वाघाला जेरबंद करण्यात आले होते. तो वाघ जखमी झाल्यामुळे त्याच्यावर गोरेवाडा प्रकल्पात उपचार करण्यात येत होते.

मात्र, १४ जानेवारी रोजी वाघाचा मृत्यू झाला. त्यानंतर एका वाघाचा वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला. १२ फेब्रुवारी रोजी वरोरा वनपरिक्षेत्राच्या सीमेवरील पोथरा नदीत वाघाचा मृतदेह तरंगताना आढळला. २६ फेब्रुवारीला ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील २७८ क्रमांकाच्या कक्षात वाघाचा मृत्यू झाला.

**स्रोत -** रवींद्र जुनारकर. 'शेतीच्या कुंपणात सोडलेला जिवंत वीज प्रवाह ठरतोय वाघांसाठी कर्दनकाळ! यावर्षी चार वाघांचा मृत्यू', *www.loksatta.com*, ०७.०२.२०२३.
'खळबळजनक! देशात जानेवारी व फेब्रुवारीत एकूण ३४ वाघांचा मृत्यू', *www.loksatta.com*, ०३.०३.२०२३.



## माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | स्रोत |
|---|---|---|---|
| चंद्रपूर | चंद्रपूर शहर | वृंदावन नगरातील घरातील पाळीव कुत्र्यावर बिबट्याचा हल्ला; कुत्र्याच्या भुंकण्याने बिबट्या पळाला | लोकसत्ता २७.०२.२०२३ |
| | भद्रावती | आयुध निर्माणी चांदा इथे बिबट्या जेरबंद; याच बिबट्याच्या हल्ल्यात चार जण झाले होते जखमी | लोकसत्ता १८.०२.२०२३ |
| | | आयुध निर्माणी चांदा इथे बिबट्या जेरबंद; याच बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झाली होती महिला | लोकसत्ता ०२.०३.२०२३, २०.०२.२०२३ |
| ठाणे | अंबरनाथ | मलंगगड परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात एक जण जखमी | लोकसत्ता २७.०१.२०२३ |
| नाशिक | नाशिक | पळसे इथे साखर कारखान्याजवळ बिबट्या जेरबंद; पशुधनावर केले होते हल्ले | लोकसत्ता १३.०३.२०२३ |
| | सिन्नर | मांजरीच्या मागे धावताना तिच्यासह बिबट्या विहिरीत | लोकसत्ता १४.०२.२०२३ |
| | त्र्यंबकेश्वर | ब्राह्मणवाडे शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात साडेतीन वर्षांच्या मुलीचा मृत्यू | लोकसत्ता १६.०३.२०२३ |
| पुणे | आंबेगाव | चांदोली परिसरात बिबट्याच्या हल्ल्यामुळे दुचाकीचा अपघात; अपघातात दाम्पत्य जखमी | लोकसत्ता ०८.०२.२०२३ |
| | | चांदोली परिसरात दुचाकीवरील दाम्पत्यावर बिबट्याचा हल्ला; महिला जखमी | लोकसत्ता २०.०३.२०२३ |
| | खेड | धुवोली गावात बिबट्याच्या हल्ल्यात बारावीतील विद्यार्थ्याचा मृत्यू | लोकसत्ता १६.०३.२०२३ |
| | वारजे उपनगर | अहिरे भागात भर वस्तीत शिरलेला बिबट्या जेरबंद | लोकसत्ता २०.०३.२०२३ |
| बुलढाणा | नांदुरा | हिंगणा इसापूर इथे बिबट्याच्या हल्ल्यात युवक गंभीर जखमी | लोकसत्ता ०८.०३.२०२३ |
| | शेगाव | डोलारखेड शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात दोघे गंभीर जखमी | |
| भंडारा | लाखांदूर | सरांडी गावात शेतातील विहिरीत पडलेल्या बिबट्याची साडेपाच तासांनंतर सुटका | लोकसत्ता ०८.०३.२०२३ |

## आशियाई पाणपक्षी गणना २०२३

### पालघर जिल्ह्यातील माकुणसार गावात पक्ष्यांच्या ९१ प्रजातींची नोंद

पालघर तालुक्यातील माकुणसार ग्रामपंचायतीने माकुणसार खाडी परिसर, मालजुई बंधारा आणि गाव परिसरातील पाणथळ जागा अशा विविध ठिकाणी पक्षीगणना केली. त्यामध्ये पक्ष्यांच्या ९१ प्रजातींची नोंद करण्यात आली. त्यात पक्ष्यांच्या ५५ स्थानिक आणि ३६ स्थलांतरित प्रजातींचा समावेश आहे. 'सह्याद्री मित्र संस्था' आणि 'नेस्ट' या संस्थांच्या सहाय्याने ग्रामपंचायतीने हा उपक्रम राबवला.

या पक्षीगणनेतील नोंदी आशियाई पक्षीगणनेसह, ई-बर्ड, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी आणि वन विभागाकडे पाठवण्यात येणार आहेत.

**स्रोत** - नरेंद्र पाटील. 'पक्षी गणना करणारी पालघर जिल्ह्यातील पहिलीच ग्रामपंचायत; गणनेत उलगडले माकुणसारचे पक्षीवैभव', *maharashtratimes.com*, २३.०२.२०२३.

### वसई, विरार शहरांमध्ये गणनेच्या पहिल्या टप्प्यात २,००० पेक्षा जास्त पक्ष्यांची नोंद

वसई, विरार शहरात महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाने पाणथळ जागेवर येणाऱ्या पक्ष्यांच्या गणनेत पहिल्या टप्प्यात दोन हजारपेक्षा जास्त पक्ष्यांची नोंद केली.

शहरातील विवा वेटलँड, चिखलडोंगरी, भुईगाव समुद्रकिनारा, गोगटे सॉल्ट वसई, राजोडी वेटलँड, गोगटे सॉल्ट नालासोपारा, निर्मळ लेक, कळंब पुलाजवळ, उमराळे अशा नऊ ठिकाणच्या पाणथळ जागांवर पक्ष्यांची गणना करण्यात आली.

**स्रोत** – 'वसई, विरारमध्ये पक्षीगणना सुरू ; पहिल्या टप्प्यात दोन हजार पक्ष्यांची नोंद', *www.loksatta.com*, १०.०१.२०२३.

### जळगाव जिल्ह्यातील हतनूर जलाशयावर पक्ष्यांच्या १४९ प्रजातींची नोंद



हतनूर धरणाच्या जलाशयावर १४९ पक्षी प्रजातींची नोंद करण्यात आली. मुक्ताईनगर इथले वनपरिक्षेत्र अधिकारी व चातक निसर्ग संवर्धन संस्था यांच्या सहयोगाने हतनूर धरणाच्या जलाशयावर १२ फेब्रुवारी रोजी गणना करण्यात आली.

चांगदेव, खामखेडी, मेहूण, चिंचोल, हतनूर, तांदलवाडी या पाच ठिकाणी ही गणना करण्यात आली.

**स्रोत** – 'हतनूर धरण जलाशयावर १४९ पक्षी प्रजातींची नोंद; वनपरिक्षेत्र अधिकारी, चातक निसर्ग संवर्धन संस्थेतर्फे आशियाई पाणपक्षी गणना', *www.loksatta.com*, १५.०२.२०२३.

### जायकवाडीत ८६ प्रजातींच्या २५,००० पक्ष्यांची नोंद

जायकवाडी पक्षी अभयारण्यात १५ जानेवारी रोजी आशियाई पाणपक्षी गणना करण्यात आली. अभयारण्यातील २५ ठिकाणी ८६ प्रजातींच्या सुमारे २५,००० पक्ष्यांची नोंद करण्यात आली.

अभयारण्याच्या ३१४ चौरस किमी क्षेत्रापैकी ५० चौरस किमी क्षेत्रात निवडक ठिकाणी गणना करण्यात आली. यामध्ये रोहित, चक्रवाक, थापट्या बदक, भुवई बदक, शेंडी बदक, नदी सूरया इ. पक्षी आढळून आले. या गणनेत वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांसह औरंगाबाद व अहमदनगर जिल्ह्यातील पक्षीप्रेमी सहभागी झाले.

**स्रोत** – 'आशियाई पाणपक्षी गणना:जायकवाडीत ८६ प्रजातींच्या २५ हजार पक्ष्यांची झाली नोंद', divyamarathi.bhaskar.com, जानेवारी २०२३.

## राष्ट्रीय बातम्या

### देशात वाघांच्या संख्येत वाढ; व्याघ्रगणनेचा अहवाल प्रकाशित

भारतातील वाघांच्या संख्येत वाढ होऊन ही संख्या ३,१६७ इतकी झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला ‘व्याघ्र प्रकल्पा’ला ५० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून भारतातील व्याघ्रगणनेचा अहवाल प्रकाशित केला. ‘व्याघ्र प्रकल्पा’ला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या स्मरणार्थ नाण्याचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले. व्याघ्रगणनेच्या अहवालातील आकडेवारीनुसार, देशातील वाघांची संख्या २,९६७ वरुन ३,१६७ वर पोहोचली आहे.

दर चार वर्षांनी होणाऱ्या व्याघ्रगणनेनिहाय देशातील वाघांची संख्या पुढीलप्रमाणे -

| वर्ष | वाघांची संख्या |
|---|---|
| २००६ | १,४११ |
| २०१० | १,७०६ |
| २०१४ | २,२२६ |
| २०१८ | २,९६७ |

**स्रोत** – ‘भारतातील व्याघ्रगणनेचा अहवाल जाहीर, देशात ३,१६७ वाघ’, www.loksatta.com, ०९.०४.२०२३.

### देशातील व्याघ्रमृत्युंबाबत सर्वोच्च न्यायालयाने मागितले सरकारकडे स्पष्टीकरण

सर्वोच्च न्यायालयाने देशातील वाघांच्या मृत्युंबाबत केंद्र सरकारला जाब विचारला आहे. देशातील वाघांच्या मृत्यूच्या प्रमाणात वाढ होत असल्याबद्दल २०१७ मध्ये अनुपम त्रिपाठी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्या. बी. व्ही. नागरत्ना यांच्या खंडपीठाने वाघांच्या मृत्युंप्रकरणी माहिती देण्याचे आदेश केंद्राला दिले आहेत. तीन महिन्यानंतर याबाबत पुन्हा सुनावणी घेण्यात येईल, असे न्यायालयाने म्हटले आहे.


वर्ष२०१२ पासून देशात वाघांच्या मृत्यूत वाढ झाली आहे. वर्षनिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे –

| वर्ष | व्याघ्र मृत्यू |
|---|---|
| २०१२ | ८८ |
| २०१३ | ६८ |
| २०१४ | ७८ |
| २०१५ | ८२ |
| २०१६ | १२१ |
| २०१७ | ११७ |
| २०१८ | १०१ |
| २०१९ | ९६ |
| २०२० | १०६ |
| २०२१ | १२७ |
| २०२२ | १२१ |

**स्रोत** - ‘वाघांच्या वाढत्या मृत्यूने सर्वोच्च न्यायालय हळहळले; केंद्र सरकारला विचारला जाब’, *www.loksatta.com*, ०५.०३.२०२३.
‘खळबळजनक! देशात जानेवारी व फेब्रुवारीत एकूण ३४ वाघांचा मृत्यू’, *www.loksatta.com*, ०३.०३.२०२३.



**वणव्याच्या व्याप्तीचा अंदाज आगाऊ वर्तवणारी प्रणाली**



उपग्रहाकडून मिळालेली माहिती आणि वनाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे जंगलातील वणवा किती क्षेत्रावर पसरेल याचा अंदाज वर्तवणारी ‘फायर स्प्रेड सिम्युलेशन सिस्टिम’ ही प्रणाली प्रगत संगणन विकास केंद्र – ‘सी-डॅक’ने विकसित केली आहे.

जंगलात लागणाऱ्या वणव्यांमुळे होणारे वनसंपदेचे नुकसान टाळण्यासाठी ही प्रणाली मदत करू शकेल अशी अपेक्षा आहे. वणवा जंगलातील किती भागात पसरू शकतो याचा अंदाज ही प्रणाली वर्तवते. त्यानुसार तातडीने उपाययोजना हाती घेता येऊ शकतात.

सिक्किममध्ये या प्रणालीची चाचणी घेण्यात आली. सी-डॅकने सिक्किमचा माहिती आणि तंत्रज्ञान विभाग, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, खरगपूर यांच्या सहकार्याने या प्रणालीची निर्मिती केली आहे. देशभरातील विविध राज्यांतील वन विभागांना ही प्रणाली उपलब्ध करून देण्यात येईल.

**स्रोत** – ‘सायबर हल्ले, जंगलातील वणवे रोखण्यासाठी प्रणाली विकसित; सी-डॅककडून निर्मिती’, *www.loksatta.com*, २१.०३.२०२३.

## आंतरराष्ट्रीय बातम्या

**जंगलतोडीच्या जागतिक क्रमवारीत भारत दुसऱ्या क्रमांकावर; भारतातील जंगलतोड सर्वात वेगवान**

वर्ष २०१५ ते २०२० या काळात भारतातील तब्बल ६, ६८, ४०० हेक्टर जंगलाचा ऱ्हास झाला आहे. जंगलांच्या सर्वाधिक ऱ्हासाच्या क्रमवारीत भारताचा ब्राझीलपाठोपाठ दुसरा क्रमांक आहे. या विषयीचा अभ्यास ourworldindata.org/ या संकेतस्थळावर प्रकाशित झाला आहे.

जगातील सुमारे ९८ देशांमध्ये गेल्या ३० वर्षांत झालेल्या जंगलतोडीविषयी माहिती या अभ्यासात दिली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेच्या वर्ष १९९० ते २००० आणि २०१५ ते २०२० या काळातील माहिती आणि आकडेवारीच्या आधारे हे विश्लेषण करण्यात आले आहे.

मागील ३० वर्षांत भारतात सर्वाधिक ६,६८,४०० हेक्टर जंगलतोड झाली. त्यापूर्वी १९९० ते २००० या दशकात भारतात ३,८४,००० हेक्टर जंगलतोड झाल्याचे अभ्यासात नमूद केले आहे. या काळात जंगलतोडीचे प्रमाण व वेग कमी होता. मात्र, त्यानंतरच्या एका दशकात जंगलतोडीचे प्रमाण व वेगात प्रचंड वाढ झाली आणि ही स्थिती त्यानंतर कायम राहिली. २०१५ ते २०२० या पाच वर्षांत भारतात झालेल्या जंगलतोडीचा वेग हा जगात सर्वाधिक आहे.
भारताच्या वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी ही तोड करण्यात आल्याचा निष्कर्ष अभ्यासात मांडला आहे. भारतापाठोपाठ वेगवान जंगलतोड झांबियामध्ये झाल्याचे अभ्यासात म्हटले आहे.

**स्रोत** – ‘देशातील सहा लाख हेक्टर जंगलाचा ऱ्हास; ९८ देशांत भारत दुसऱ्या क्रमांकावर’, *maharashtratimes.com*, ३०.०३.२०२३.




**AVAILABLE AT 25% DISCOUNT**

## The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra
News and Information from the Protected Area Update 1996-2015

Published by

Duleep Matthai Nature Conservation Trust, Kalpavriksh and Rainfed Books




**Contents:**

**- Editor's Note**

**- Protected Areas in Maharashtra – a brief introduction**

**- Section 1:** *News and Information from protected areas*

**- Section 2:** *Analysis and Perspective:*

1) Media reporting on the protected areas in Maharashtra -A thematic analysis (Trupthi Narayan and Pankaj Sekhsaria); 2) Wildlife coverage in the Marathi Print Media – a practitioner's perspective (Reshma Jathar); 3) Dividing lines- tribal rights and tiger reserves (ShibaDesor); 4)Rocky plateaus: Little understood treasures of the Western Ghats (Aparna Watve) and 5) Community Conserved Areas in Maharashtra (Neema Pathak Broome with Sneha Gutgutia, Shruti Mokashi, Kavya Chowdhry, Sarosh Ali and Rupesh Patil)

ISBN: 9788192326931, Price Rs. 400; xi+235pp, 100 line-drawings by Ashvini Menon


**For copies at 25% discount write to** psekhsaria@gmail.com


## Books from the *PA Update* stable


The set of 3 available for a special 25% discounted price of Rs. 1000

1) *Conservation Kaleidoscope: People, Protected Areas and Wildlife in Contemporary India*, 2021, 450 pp, 140 line-drawings., Price: Rs. 650
2) *The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra: News and Information from the Protected Area Update 1996-2015,* 2019. 250 pp, 100 line-drawings, Price: Rs. 400
3) *The State of Wildlife in North-East India 1996-2011: A compilation of news from the Protected Area Update,* 2013, 330 pp, 100-line drawings, Price: Rs. 300

**For more details and to order copies, please write to** psekhsaria@gmail.com







# थोडक्यात पण महत्त्वाचे...

## लोकजीवन आणि वन्यजीवांमधील जिव्हाळ्याच्या अनुबंधाची प्रचिती देणारा पावश्या

नैऋत्य मान्सून वाऱ्याद्वारे भारताच्या बऱ्याच मोठ्या भागात पावसाचे आगमन होते. जुन्या काळी मान्सूनच्या पावसावरती शेतीचे आणि - एकंदर इथल्या लोकांचे अस्तित्व अवलंबून असल्याने, शेतकरी पावसाच्या येण्याकडे डोळे लावून बसलेला असायचा. शेतीचे प्रमाण कमी होत असले तरी आजसुद्धा पावसावर कष्टकऱ्यांचे जीवन अवलंबून आहे. पावसाच्या आगमनापूर्वी काही कृमी, कीटक, पशुपक्षी मानवी समाजाला त्याची पूर्वसूचना देत आलेले आहेत. पक्षीविश्वात 'पावश्या' नावाने परिचित असलेल्या पक्ष्याला लोकमानसाने महत्त्वाचे स्थान दिले होते. ग्रीष्म ऋतू माथ्यावरती पोहचला, उष्माघाताने अंगाची लाहीलाही होऊ लागली की आकाराने कबुतराएवढा, अंगावरती उदी रंगाचे पट्टे, लांब शेपटीच्या पावश्याचे आगमन होते ते पेरते व्हा असा जणू संदेश देत! 'कॉमन हॉक ककू' अथवा 'ब्रेन फिव्हर बर्ड' अशी इंग्रजी नावे असलेल्या पावश्याचा आवाज खरे तर शेतकरी समाजाला पावसाळी शेतीच्या कामाची लगबग वाढवा आणि भाताच्या दाणागोट्यांची पेरणी करण्यासाठी सिद्ध व्हा, असेच पिढ्यान् पिढ्या सांगत आलेला आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या परिसरातले शेतकरी पावश्या पक्षाच्या आगमनाची कशारितीने वाट पहातात आणि त्याचे आगमन त्यांना शेतात भाताची पेरणी करण्यासाठी कसे प्रवृत्त करते हे अनुभवले होते. त्यांच्या कवितेत याचा उल्लेख आहे.

पेरनी पेरनी<br>
आले पावसाचे वारे<br>
बोलला व्होलगा<br>
पेर्ते व्हा रे पेर्ते व्हा

पावश्याची जून ते सप्टेंबर या कालखंडात वीण असते. मादीला आकर्षित करण्यासाठी म्हणून पावश्या विशिष्ट ध्वनी निर्माण करतो. त्यातून लोकमानसाला वेगवेगळे अर्थ ध्वनित होतात. गोवा, महाराष्ट्रातील शेतकरी समाजाला हा पक्षी आपल्या आवाजातून 'पेरते व्हा, पेरते व्हा' असे सूचित करतो असे वाटते, तर कोणाला तो अस्वस्थ होऊन आपल्या पूर्वाश्रमीच्या जीवनातील नाहीशा झालेल्या प्रेयसीचा शोध घेत असल्याची भ्रांती निर्माण होते. हिंदी चित्रपट विश्वात एकेकाळी श्रवणीय आवाजासाठी ख्यात असलेल्या प्रितीसागर यांचे 'बोले रे पपीहा' हे गाणे प्रियकर आणि प्रेयसीच्या विरहयुक्त लोककथेची प्रचिती देते. परंतु गोव्यात प्रचलित लोककथेत भावाबहिणीचा उल्लेख असून, भाऊ आपल्या बायकोला आणि बहिणीला पोहे करण्यासाठी भात देतो. तेव्हा बायको त्या भातापासून जे पोहे करते, ते वजनाला जास्त होतात. बहिणीने केलेले पोहे कमी होतात ते भातापासून व्यवस्थित पोहे कांडल्याने त्यांचे प्रमाण कमी झाल्याने. भाऊ मात्र बहिणीने पोह्यांसाठी दिलेले भात लपवून ठेवले असा संशय घेऊन तिला जबर मारतो, त्यात तिचा मृत्यू होतो. बहिणीची भावावरती माया असल्याने तिने भातातली फोलपटे काढून टाकून नीटनेटके करून पोहे तयार करून दिल्याने ते वजनाला कमी पण चवीला रुचकर झालेले असतात, हे भावाच्या लक्षात येते. त्याला आपल्या कृत्याबाबत पश्चाताप होतो. परंतु तोपर्यंत बहिणीचा करुण मृत्यू होऊन पावश्या पक्ष्यात रूपांतर झालेले असते. बहिणीची ही शोकांतिका गोव्यातील पारंपरिक स्त्रीमनाला मान्सूनच्या पावसाचे आगमन होण्यापूर्वी लक्षवेधक ध्वनी करणाऱ्या पावश्यामुळे उमजते.

मान्सूनचा पाऊस हा गोवा-कोकणातल्या बोतकऱ्यांचा भाग्यविधाता आणि त्याच्या आगमनाचा संदेश घेऊन येणारा म्हणून पावश्याला लोकजीवनात आणि संस्कृतीत महत्त्वाचे स्थान आहे. पूर्वीच्या काळी मानवी जीवनाला निसर्ग आणि पर्यावरणाने व्यापले होते. त्यामुळे लोकमानसात परिसरातील वृक्षवेली, पशुपक्षी यांच्याविषयी जिव्हाळ्याचे अनुबंध निर्माण झाले आहे. पावश्या तर मिलनास आतुरलेला असतो आणि त्यासाठी मादीला आर्तपणे हाक मारतो. कोकिळेच्या मादीसारखी पावश्याची मादी आपली अंडी दुसऱ्या पक्ष्यांच्या घरट्यात घालून पसार होते. पिल्ले मोठी झाल्यावर जेव्हा 'पेरते व्हा' म्हणू लागतात, तेव्हाच त्यांचे वेगळेपण सिद्ध होते.

**- राजेंद्र केरकर**

rpkerkar65@gmail.com

संस्थापक, विवेकानंद एन्व्हॉयर्न्मेंट ब्रिगेड, केरी, गोवा

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa,
908 Deccan Gymkhana, Pune 411004